वाचले:-

१) **अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय** यांचे पत्र क्रमांक **वायसीएमएच/४/कावि/१०२३/२०२२** दिनांक **०८/०७/२०२२**

२) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१).

३) अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/१/कावि/११७५/२०१३.दिनांक २९/०८/२०१३.

४) प्रशासन विभागाकडील दि. ०१/०८ /२०२२ रोजीचा मान्य प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.
क्रमांक: **प्रशा/३अ/कावि/१८५/२०२२**
दिनांक : ०१ /०८ /२०२२

विषय :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तिबाबत.....
श्रीम. पवार अरुणा बाबूराव, पदनाम – नेत्र चिकित्सा अधिकारी,(संगणक क्रमांक ४४१७)

आदेश,

श्रीम. **पवार अरुणा बाबूराव** हया पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **नेत्र चिकित्सा अधिकारी,** या गट **क** मधील पदावर **वाय.सी.एम.एच.४** विभाग येथे काम करीत आहेत. दिनांक **२०/०५/१९९१** रोजी त्या म.न.पा.मध्ये **नेत्र चिकित्सा सहाय्यक** या पदावर रूजू झाल्या आहेत. त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख **२४/०८/१९६४** अशी असून दिनांक **२३/०८/२०२२** रोजी त्यांच्या वयास **५८** वर्ष पूर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) नुसार गट **क** मधील कर्मचा-यांना वयाची **५८** वर्ष पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांनी दिनांक **०८/०७/२०२२** रोजीच्या पत्रान्वये, श्रीम. **पवार अरुणा बाबूराव, नेत्र चिकित्सा अधिकारी,** यांचेकडून म.न.पा.चे **नवीन घर कर्ज, घरदुरुस्ती कर्ज,** वाहन **कर्ज, संगणक कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज, सोसायटी कर्ज व वैद्यकीय अग्रिम येणे बाकी नाही.** तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. असा अहवाल सादर केला असून, त्यांना दिनांक **३१/०८/२०२२** रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

सबब, **अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय** यांचेकडील दिनांक **०८/०७/२०२२** रोजीचा अहवाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियमातील उक्त तरतूद विचारात घेऊन उपरोक्त वाचले क्रमांक ३ वरील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार श्रीम. **पवार अरुणा बाबूराव, नेत्र चिकित्सा अधिकारी,** यांना दिनांक **३१/०८/२०२२** रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

श्रीम. **पवार अरुणा बाबूराव, नेत्र चिकित्सा अधिकारी,** यांना निवृत्तिवेतन,सेवा-उपदान इ.रकमा अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता संबंधित विभागाने करून प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सत्वर लेखा विभागाकडे पाठवावे. लेखा विभागाने श्रीम. **पवार अरुणा बाबूराव, नेत्र चिकित्सा अधिकारी** यांचेकडून महापालिकेस घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, वैद्यकीय अग्रिम, इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय? याबाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास, ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करुन अंतिमत: देय रक्कम त्यांचे सेवानिवृत्तिचे दिनांकास अदा करावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम. **पवार अरुणा बाबूराव** पदनाम - **नेत्र चिकित्सा अधिकारी,** यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सहाय्यक आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 411018.

प्रति,

श्रीम. **पवार अरुणा बाबूराव,**
पदनाम- **नेत्र चिकित्सा अधिकारी,**
वाय सी एम रुग्णालय विभाग,

प्रत :- १) लेखा विभाग २) मुख्य लेखापरिक्षण ३) वैयक्तिक नोंद कक्ष ४) गोपनिय अहवाल कक्ष ५) सेवाज्येष्ठता कक्ष ६) मागासवर्ग कक्ष ७) संगणक कक्ष - प्रशासन ८) विद्युत विभाग ९) दूरसंचार विभाग १०) कामगार कल्याण विभाग ११) पि. चि. म. न. पा. कर्मचारी महासंघ १२) पि. चि. म. न. पा. सह. पतसंस्था
१५) **वाय सी एम रुग्णालय** विभाग

२/- सोबत श्रीम. **पवार अरुणा बाबूराव** पदनाम - **नेत्र चिकित्सा अधिकारी,** यांचे सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.